## -: प्रसिध्दीपत्रक :-

# पोलीस शिपाई चालक / पोलीस शिपाई भरती -२०१९

सांगली पोलीस घटकातील पोलीस शिपाई चालक भरती -२०१९ मधील रिक्त असलेली ७७ पदांची लेखी परीक्षा दिनांक २१.०९.२०२१ रोजी व पोलीस शिपाई भरती - २०१९ मधील रिक्त असलेली १०५ पदांची लेखी परीक्षा दिनांक २३.०९.२०२१ रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदरची लेखी परीक्षा सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महाविद्यालय व शाळा येथील परीक्षा केंद्रावर होणार आहे. ज्या उमेदवारांनी सांगली पोलीस घटकासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज भरले आहेत त्या सर्व उमेदवारांनी दिनांक १४.०९.२०२१ रोजी पासून https://mahapolicerc.mahaitexam.in या पोर्टलवरुन लेखी परीक्षेचे **प्रवेश पत्र (ADMIT CARD)** उपलब्ध करुन घेण्याचे आहे. सदर प्रवेश पत्रासमवेत स्वंय घोषणापत्र (वचनपत्र), ओएमआर आधारित परीक्षेसाठी महत्वपूर्ण सूचना व कोविड १९ च्या संदर्भात उमेदवारांसाठी सल्ले इत्यादी माहितीच्या प्रतीही संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्याच्या आहेत. तसेच ऑनलाईन आवेदन अर्ज केलेल्या सर्व उमेदवार यांच्या ई-मेल आयडीवरही प्रवेश पत्र उपलब्ध करुन देण्यात येणार असून ते त्यांनी प्राप्त करुन घेण्याचे आहे.

उमेदवारांनी लेखी परीक्षेसाठी प्रवेश पत्र **(ADMIT CARD)** मध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्र ठिकाणी विहित वेळेत सोबत दिलेल्या सूचना नुसार हजर राहण्याचे आहे.

स्वाक्षरी/-

**( दिक्षीत गेडाम )**

**पोलीस अधीक्षक, सांगली**

Scanned by CamScanner